# सक्षम प्राधिकारी, महाराष्ट्र ठेवीदाराच्या हितसंबंधीचे संरक्षण अधिनियम, १९९९ तथा उप विभागीय अधिकारी मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय

**प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पू), मुंबई ४०० ०५१ . दुरध्वनी क्र. ०२२-२६५१०१३६**

---

क्र. /उविअ/का-५/सि.यु.मा./लिलाव/जा.नो/१८

दिनांक :१०/०१/२०१८

## महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधीचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये जप्त केलेल्या मालमत्तेच्या लिलाव विक्रीची जाहीर नोटीस

ज्याअर्थी श्री.उदय मोहनलाल आचार्य, यांच्या मालकीच्या सी.यु.मार्केटिंग कंपनीच्या महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधीचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये जप्त केलेल्या मालमत्ता संबंधी मा. विशेष न्यायालयातील प्रकरण क्र. ३६/२००० मध्ये जे आरोपी आहेत आणि त्यांची खालील तक्त्यात (मा. सर्वोच्च न्यायालया कडून गुन्हेगारी संकिर्ण दावा क्र. ७५२/२०१० मधील मंजूर परिशिष्ट-२ च्या मान्यतेनुसार) नमूद मालमत्ता जप्त करण्यात आली आहे व त्याची लिलावाद्वारे विक्री करण्याचे मा. विशेष न्यायालयाने आदेश दिले आहेत.

त्याअर्थी या द्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मालमत्ता जशी आहे जेथे आहे त्यास्थितीत वर नमूद केलेल्या पत्त्यावरील सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे मार्फत खालील अटी व शर्ती वर लिलावाद्वारे विकण्यात येणार आहे. ज्या व्यक्तिस सदर मालमत्ते पैकी एक किंवा अधिक मालमत्ता विकत घ्यावयाच्या असतील त्यांनी प्रत्येक मालमत्तेसाठी रू. १००/- किंमतीचा स्वतंत्र अर्ज प्राप्त करून या अर्जामध्ये प्रत्येक मालमत्तेच्या न्युनतम किंमतीच्या (शासकीय मुल्यांकन कर्त्यांनी सादर कलेल्या मुल्यांकनाच्या रक्कमेच्या) १०% रकमेचा डि.डि./पे-ऑर्डर (फक्त राष्टीयकृत बँके कडील) बयाणा रक्कम सोबत जोडून लिलावात भाग घेऊ शकतील. डि.डि. /पे-ऑर्डर सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर, प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पू), मुंबई -४०० ०५१ यांचे कार्यालयात दि.२०/०१/२०१८ रोजी सायं-५.०० वा पर्यंत किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा बेताने पाठवावा. सदर मालमत्ते संबंधी विस्तृत माहिती अर्जाचा नमुना व लिलावाच्या अटी व शर्ती बाबतची माहिती कार्यालयीन वेळेत अर्जदारास उपलब्ध करून देण्यात येईल. त्यांनतर आलेल्या अर्जाचा विचार करण्याचे अधिकार मा. विशेष न्यायालयास राहतील. पात्र अर्जदारांना लिलावाची तारीख स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

| मुळ जाहिराती तील अ. क्र. | मिळकतीचा तपशिल | मालमत्तेची वर्गवारी | क्षेत्रफळ | शासकीय मान्यता प्राप्त मुल्यांकना कर्त्या नुसार मुल्य रू. | १०% बयाणा रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | व्हि.आय.पी.पॅलेस हॉटेल (हॉटेल दामजीस) न.भू.क्र. १९०३, १९०३, १ ते ७ प्लॉट नं. ४५६ अ, (जुना), अंतिम भुखंड क्र. ५०९ (नविन) आझाद रोड, विलेपार्ले (पू), मुंबई-५७ | वाणिज्य | ९०९.२० चौ.मी. | २७,४३,०५,६४०/- | २,७४,३०,५६४/- |
| ६ व ७ | फ्लॅट नंबर- ई-२०४ व ई-३०४, झरना इन्कलेव को.ऑप.हौ.सो, साईधाम मंदीराजवळ, आशा नगर,ठाकुर कॉम्पलेक्स पश्चिम द्रुतगती मार्ग, कांदिवली पूर्व, मुंबई-१०१ | निवासी फ्लॅट नं. ई-२०४ व ई-३०४ | ९५.८२ चौ. मी. | १,१९,५८,३३६/- | ११,९५,८३४/- |
| ८ व ९ | फ्लॅट नंबर-ई-४०६ व ई -५०६, झरना इन्कलेव को.ऑप.हौ.सो, साईधाम मंदीराजवळ, आशा नगर,ठाकुर कॉम्पलेक्स पश्चिम द्रुतगती मार्ग, कांदिवली पूर्व, मुंबई- १०१ | निवासी फ्लॅट नं. ई-४०६ व ई-५०६ | ९५.८२ चौ. मी. | १,१९,५८,३३६/- | ११,९५,८३४/- |
| ११ | फ्लॅट नं. ई-२०३ व ई-३०३, झरना इन्कलेव को. ऑप. हौ. सो., साईधाम मंदीराजवळ, आशा नगर, ठाकुर कॉम्पलेक्स पश्चिम द्रुतगती मार्ग, कांदिवली पूर्व, मुंबई-१०१ | निवासी ई-२०३ व ई-३०३ | ९५.८२ चौ. मी. | १,१९,५८,३३६/- | ११,९५,८३४/- |
| १२ | फ्लॅट नं. ई-४०५ व ई-५०५, झरना इन्कलेव को. ऑप. हौ. सो., साईधाम मंदीराजवळ, आशा नगर,ठाकुर कॉम्पलेक्स पश्चिम द्रुतगती मार्ग, कांदिवली पूर्व, मुंबई-१०१ | निवासी ई-४०५ व ई-५०५ | ९५.८२ चौ. मी. | १,१९,५८,३३६/- | ११,९५,८३४/- |
| १५ | ए-२९ (A, B), ए-३१ (A, B) व ए-३२ (A, B) ऑफिस प्रिमायसेस ऑफ/उदय ऑफसेट (मुंबई संध्या) गोकुळ आर्केड, सुभाष रोड, गरवारे समोर, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-५७ | ए-२९ (A) व ए-२९ (B) | २५.०८ चौ.मि. | ४७,८०,२४८/- | ४,७८,०२५/- |
| | | ए-३१ (A) व ए-३१ (B) | २५.०८ चौ.मि. | ४७,८०,२४८/- | ४,७८,०२५/ |
| | | ए-३२ (A) व ए-३२ (B) | २५.०८ चौ.मि. | ४७,८०,२४८/- | ४,७८,०२५/ |
| १८ | हॉटेल जाल न.भु.क्र. १७५२ अ, एफ.पी. नं.२०३, हॉटेल एव्हीयन जवळ, इंटरनॅशनल एअरपोर्ट व हॉटेल सहारा स्टार, वेस्टर्न एक्यप्रेस हायवे. मुंबई-५७. | वाणिज्य | १२९६.०० चौ.मि. | ३९,८७,१४,४०० | ३,९८,७१,४४० |

## लिलावाच्या अटी व शर्ती

१) लिलावात भाग घेणाऱ्यांनी अनामत रकमेचा डि.डि./पे-ऑर्डर (फक्त राष्टीयकृत बँके कडील) अर्जा समवेत COMPETANT AUTHORITY & SUB DIVISIONAL OFFICER, MUMBAI WESTERN SUBURBAN यांचे नावे जमा करावा लागेल.

२) प्रत्यक्ष लिलावाच्या वेळी किमान ३ खरेदीदारांनी बोली लावणे बंधनकारक आहे. तीन पेक्षा कमी खरेदीदार उपस्थित असल्यास लिलाव त्या दिवशी रद्द करण्यात येईल व लिलावाची पुढील तारीख मा. न्यायालयाच्या निर्देशानुसार ठरविण्यात येईल.

३) यशस्वी खरेदीदार म्हणून जाहीर करण्यात आलेल्या पक्षकाराने अंतिम बोलीची उर्वरित रक्कम लिलावाच्या तारखेपासून ६० दिवसाचे आत COMPETANT AUTHORITY & SUB DIVISIONAL OFFICER, MUMBAI WESTERN SUBURBAN यांच्या नांवे डिमांड ड्राफ्ट/ पे ऑर्डर भरणे बंधनकारक असेल. सदर पूर्ण रक्कम खरेदीदारांनी जमा केल्यानंतरच मालमत्ता विक्री संदर्भात मा. न्यायालयाच्या आदेशानुसार विक्री प्रमाणपत्र देणेत येईल. तसेच मा. न्यायालयाच्या आदेशा नंतरच यशस्वी बोली लावणाऱ्यांचे उर्वरीत रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट/ पे ऑर्डर वटविण्यात येईल.

४) जप्त मालमत्ता विक्री संदर्भात दस्तऐवज करण्यापूर्वी/केलेनंतर मालमत्तेचे मुद्रांक शुल्क व दस्तऐवज नोंदणी शुल्क हस्तांतरण फी, फेरफार फी तसेच अन्य कोणत्याही प्रकाराची शासकीय शुल्क भरण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील.

५) जप्तीच्या दिनांपासून ते यशस्वी बोली दारांना ताबा द्यावयाच्या तारखेपर्यंतचा त्या जागेचा महापालिकेकडील मालमत्ता कर, पाण्याचे देयक तसेच विद्युत देयक, दूरध्वनी देयक, सोसायटीची थकबाकी, तसेच जप्त मालमत्तेवर असलेल्या अन्य कोणत्याही प्रकारच्या थकबाकीची रक्कम मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.११/५/२०१० रोजीच्या निर्णयानुसार यशस्वी बोलीच्या रक्कमेतून भरणेत येईल. जप्तीच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दिनांक १७/५/२००० पूर्वी देय असलेली थकबाकी व ताबा दिल्या नंतर प्रस्तुत मालमत्तेची उपरोक्त नमुद केल्या प्रमाणे देय असलेली रक्कम यशस्वी बोलीदाराने भरणे क्रमप्राप्त असेल.

६) ज्या मालमत्तांच्या खरेदी किंमती ५० लाखापर्यंत आहेत अशा मालमत्तांच्या दोन बोलीमधील फरक १० हजारापेक्षा कमी नसेल अशा पटीत बोली लावणे बंधनकारक असेल.

७) ज्या मालमत्तांच्या खरेदी किंमती ५० लाखापेक्षा जास्त आहेत अशा मालमत्तांच्या दोन बोलीमधील फरक १ लाखापेक्षा कमी नसेल अशा पटीत बोली लावणे बंधनकारक असेल.

८) लिलाव प्रक्रियेसाठी होणारा एकूण खर्च प्राप्त विक्रीतून किंवा जमा रक्कमेतून वजा केला जाईल.

९) खरेदीदार म्हणून जाहीर करण्यात आलेल्या पक्षकाराने उरलेली संपुर्ण रक्कम वरील विहित ६० दिवसांच्या मुदतीत न भरल्यास स्थावर जप्त मालमत्ता घेण्यास तो इच्छुक नाही असे गृहीत धरून जमा असलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल व ती मालमत्ता पुन्हा लिलावाद्वारे विक्रीस काढणेत येईल.

१०) वरील जप्त मालमत्ते पैकी कोणतीही मालमत्ता जर कोणत्याही इच्छुक खरेदीदारास पहावयाची असेल तर सदर लिलाव प्रक्रियेत भाग घेणाऱ्या खरेदीदारास मा.सर्वोच्च न्यायालय यांच्या वरील आदेशानुसार या कार्यालयातील प्रतिनिधींच्या उपस्थितीत दाखविण्यात येईल.

११) वरील मिळकतीचे या कार्यालयात उपलब्ध असलेले कागदपत्र तपासावयाचे किंवा ते हवे असल्यास शासकीय नियमानुसार शुल्क आकारले जाईल.

१२) सदर लिलावात अर्जदारांना भाग घेणे पूर्वी शासकीय मुल्यंाकनानुसार १०% बयाणा रक्कम भरणे आवश्यक आहे. हि जाहिरात **http://mumbaisuburban.gov.in** या संकेतस्थळावर तसेच या कार्यालयासह मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मा. जिल्हाधिकारी पालघर, व मा. नगर दिवाणी न्यायालय मुंबई, कोर्ट रूम नं. ३६ यंचे नोटीस **बोर्डावर** प्रसिध्द करण्यात आली आहे.

१३) वरील अटी व शर्तीमध्ये फेरबद्दल करणेचे व अतिरिक्त अटी शर्ती ठरविणेचे सर्व हक्क या कार्यालयाने राखून ठेवले आहेत.

टिप :- १) उपरोक्त मालमत्तें पैकी मुंबई उपनगर जिल्ह्यातील मालमत्ता पहाणीसाठी सर्व कार्यालयीन कामाकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० यावेळेत पूर्व नियोजित वेळ घेऊन उपलब्ध करून देण्यात येईल.

**सक्षम प्राधिकारी**
**एम.पी.आय.डी.कायदा १९९९**
**तथा**
**उप विभागीय अधिकारी**
**मुंबई पश्चिम उपनगर**